# सातारा जिल्हा परिषद सातारा

## शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद सातारा

दुरध्वनी - ०२१६२-२३७४७१ फॅक्स: ०२१६२-२३९४७२ ई-मेल: ssasatara1@rediffmail.com


### मान्यता / नूतनीकरण २०२५ ते २०२८ मान्यता आदेश

### नमुना दोन

ज.क्र:- शिक्षण/प्रा/प्रशा-१/आरटीई मान्यता/MWR२१३-२०२५
दिनांक:- 02 APR 2026

प्रति,

**२४. मुख्याध्यापक, बिलिमोरिया हायस्कूल पाचगणी ता. महाबळेश्वर, जि. सातारा**

**युडीआयएस क्रमांक :- 27310606504**

**विषय:- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ याच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ च्या नियम ११, पोट-नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.**

शाळेच्या मुख्याध्यापकांनी **गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती महाबळेश्वर** कार्यालयाकडे सन २०२५ ते २०२८ पर्यंतच्या आरटीई मान्यतेच्या/नूतनीकरणासाठी सादर केल्याच्या प्रस्तावानुसार गटशिक्षणाधिकारी यांनी शाळेची तपासणी करून सदर शाळा नियमानुसार आरटीई अक्ट - २००९ अन्वये भौतिक सुविधा पूर्ण करीत असलेने **गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती महाबळेश्वर** यांचेकडील प्राप्त प्रस्तावानुसार आरटीई मान्यतेबाबतच्या शिफारशीसह स्वप्रतिज्ञापत्रास अधीन राहून

मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प. सातारा दिनांक **०१/०४/२०२५ पासून ते दिनांक ३१/०३/२०२८** पर्यंतच्या कालावधीसाठी **इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी माध्यम- इंग्रजी अनुदान प्रकार - विनाअनुदानित शाळा – बिलिमोरिया हायस्कूल पाचगणी ता. महाबळेश्वर जि. सातारा** या शाळेस तात्पुरती आरटीई २००९ अंतर्गत मान्यतेस / नूतनीकरणास मान्यता देण्यात येत आहे.

**सदर मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीपर्यंत मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्तितीत कोणतेही बंधन नसेल.

२. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदींचे शाळा पालन करेल.

३. शाळा विनाअनुदानित असल्यास नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी किमान २५ टक्के मर्यादित प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकांचे अनुपालन कारणात येईल.

४. विनाअनुदानित / स्वयंअर्थसहाय्यित शाळांसाठी परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाचा कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळा स्वतंत्र बँक खाते देईल.

५. संस्था / शाळा कोणतीही कॅपिटेशन वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पद्धितीसाठी बालकांस किंवा त्याचा / तिच्या माता-पित्यास किंवा पालकांस भाग पडणार नाही.

PRINCIPAL
BILLIMORIA HIGH SCHOOL
PANCHGANI - 412 805

६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्या अभावी धर्म, जात, वंश, जन्मस्थान किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शि. पूर्ण होईपर्यंत शाळेतुन काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रत्येक बालकास नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३ (१) अन्वये निर्धारित केलेली किमान शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तीची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील आणि

(आठ) शिक्षकांनी / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

९. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केल्याला मानकांचे व प्रमाणकाचे पालन करील. शाळा तपासणीच्या वेळी शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा आर.टी.ई च्या दहा निकषांची पूर्तता करीत असलेबाबत **गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती महाबळेश्वर** यांचेकडून स्व-प्रमाणपत्र दिलेले आहे.

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाही.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरात येतील.

१३. शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणीकृत संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तिसंघाचा किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळवण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालांकडून लेखापरीक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्र तयार करा. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे पाठविण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेला **मान्यता संकेतांक क्र:-MWR0606504** असा आहे. हा या कार्यालयास कोणत्याही पत्रव्यवहार करताना कृपया ती नमूद करावा. याची नोंद घ्यावी.

१७. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तींची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण दे अशा सूचनांचे पालन करावे.

१८. संस्थेची नोंदणी विषयक कोणत्याही प्रकारचे नूतनीकरण केलेले केल्याची सुनिश्चिती करावी.

टिप:- शाळेतील मुख्याध्यापकांनी सन २०२५ ते २०२८ पर्यंत आरटीई मान्यता / नूतनीकरणासाठी संबंधित गटशिक्षणाधिकारी / प्रशासनिक कार्यालयाकडे सादर करण्यात आलेली ओरी (दुय्यम) नस्ती / फाईल पृष्ठ क्रमांकासह आपल्या कडे व्यवस्थित जतन ठेवावी. भविष्यात माहिती अधिकारातील अर्ज कार्यवाही व नियमांनुसार शाळेकडे वर्ग करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

PRINCIPAL
BILLIMORIA HIGH SCHOOL
PANCHGANI - 412 805

(अनिरुद्ध नायकवडी)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद सातारा